पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेस नोट

दिनांक :२९/१०/२०२४

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांविरोधात संपुर्ण जिल्हयात व्यापक स्वरूपात कारवाई

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक परिक्षेत्राचे मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दि. १५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

दिनांक २८ व २९ ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणी अवैध देशी दारू विक्री करणारे व गावठी हातभट्टीची दारू बनविणारी ठिकाणे, त्यामध्ये डोंगर, द-या, नदी, नाले अशा अतिदुर्गम ठिकाणांवर पायपीट करून, तसेच **ड्रोन कॅमेरॅद्वारे पाहाणी करून वरील ठिकाणांचा** शोध घेवून छापे टाकण्यात आले आहे.

सदर कारवाईत अवैधरित्या देशी दारू विक्री करणारे तसेच गावठी हातभटटी दारु बनविणा-या इसमांवर कारवाई करण्यात आली असुन, नाशिक ग्रामीण जिल्हयात **३३ आरोपीतांविरुध्द एकूण ३६ गुन्हे** दाखल करण्यात आलेले आहेत. सदर कारवाईत **एकूण २६०००/- रूपयचे किंमतीची देशी दारू** जप्त करण्यात आलेली आहे. तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे **रसायन २५२६५ लिटर व तयार गावठी दारु ४९९ लिटर व इतर साहित्य सामुग्री ९६९००/- असा एकुण १००७९०० /- रूपये** किंमतीचा मुद्देमाल नाश करण्यात आला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस ठाणे निहाय वरील प्रमाणे सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.